Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत दिला जाणारा "प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार" - २०१९ हा ज्येष्ठ विचारवंत मा. प्रा. (डॉ.) एन. डी. पाटील यांना जाहीर झाला आहे.

या समारंभासाठी **माननीय श्री. शरदचंद्रजी पवार, सदस्य, राज्यसभा तथा माजी केंद्रीय कृषीमंत्री** हे प्रमुख पाहुणे असून प्रा. डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू हे समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

सदर पुरस्कार प्रदान समारंभ दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी सायंकाळी ०५.१५ वाजता **राजर्षी शाहू सभागृह,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे होणार आहे. तथापि दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी दुसरा शनिवार असल्याने यादिवशी कार्यालयास असणारी सुट्टी रद्द करण्यात आलेली आहे. सदर दिवशी कार्यालय नियमित वेळेनुसार सुरू राहील. तरी सदर समारंभास सर्वांनी उपस्थित रहावे.

सदर दिवसाची पर्यायी सुट्टी यथावकाश जाहीर करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक महाविद्यालयांना लागू राहणार नाही.

कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 21
दिनांक: 7 JAN 2019

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. प्राचार्य/संचालक, संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांना फक्त माहितीसाठी
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
५. मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
६. इंटरनेट विभाग- सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (Intranet)

**टीप- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, यांच्या निदर्शनास आणावे**